ग्रंथमालिका ‘स्वभावदोष आणि अहं यांचे निर्मूलन’ : खंड ६

# स्वभावदोष आणि अहं यांच्या विविध पैलूंचे विश्लेषण

मराठी (Marathi)

**ग्रंथ-निर्मितीविषयी मार्गदर्शक**


हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**


**संकलक**


**सौ. सुप्रिया सुरजीत माथूर**


**कु. मधुरा भिकाजी भोसले**



**सनातन संस्था**


ऑगस्ट २०२३ पर्यंत सनातनच्या ३६२ ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९४ लाख १८ सहस्र प्रती !

## ग्रंथ-निर्मितीविषयी मार्गदर्शक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय !



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून ३.९.२०२३ पर्यंत १२५ साधक संत झाले, तर १,०४६ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय



## सौ. सुप्रिया सुरजित माथूर

सनातनच्या रामनाथी, गोवा येथील आश्रमात पूर्णवेळ सेवा करतात. वर्ष २०१४ पासून 'स्वभावदोष आणि अहं निर्मूलन प्रक्रिया' राबवण्यासाठी भारतभरातून येणाऱ्या साधकांना मार्गदर्शन करतात. त्यामुळे अनेक साधक संबंधित प्रयत्न नेमकेपणाने करू लागले आहेत.



## कु. मधुरा भिकाजी भोसले

या पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल शास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. या धार्मिक विधी, यज्ञयाग आदींचे सूक्ष्म-परीक्षणही करतात. डिसेंबर २०१८ पर्यंत यांनी ६१ टक्के आध्यात्मिक पातळीचा स्तर गाठला आहे.

---

# प्रस्तुत ग्रंथाची अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**१. स्वभावदोष निर्माण होण्याची काही कारणे १२**

१ अ. अयोग्य दृष्टीकोन असणे १२

१ आ. अयोग्य विचारप्रक्रियेमुळे पुन:पुन्हा निराशा किंवा ताण येणे १२

**२. साधनेतील अडथळे १३**

२ अ. मनाचा अडथळा २ आ. बुद्धीचा अडथळा १३

२ इ. मन आणि बुद्धी यांच्या अडथळ्यांमुळे होणारे काही त्रास आणि ते अडथळे दूर करण्याचे उपाय १३

**३. विविध स्वभावदोषांचे विश्लेषण** १६

३ अ. आळस ३ आ. अव्यवस्थितपणा १६

**४. स्वभावदोषांच्या मागे अहं दडलेला असणे** ३०

४ अ. उतावीळपणामागे प्रामुख्याने अहं दडलेला असणे ३०

४ आ. घाईत निर्णय घेण्यामागील अहंचे पैलू ३०

**५. स्वभावदोषांमुळे होणारी हानी** ३०

५ अ. स्वत:ला आणि इतरांना त्रास होणे ३०

५ आ. साधनेत घसरण होणे ३१

**६. अहं** ३१

६ अ. अर्थ ६ आ. अहंचे प्रकार ३१

**७. चुका होणे आणि स्वीकारणे** ४९

७ अ. कृती आणि मन यांच्या स्तरांवर विविध चुका होणे ४९

७ आ. मनाची प्रक्रिया व बोलण्यातील चुका यांचा परस्परसंबंध ४९

**८. सनातनच्या आश्रमातील ‘युवा साधना शिबिरा’त सहभागी झालेल्या साधिकेने ‘स्वभावदोष-निर्मूलन’ याविषयी व्यक्त केलेले विचार** ५८

८ अ. ‘युवा साधना शिबिरा’चा उद्देश ८ आ. साधिकेचे विचार ५८

**९. ‘साधनेला ‘स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाच्या प्रक्रिये’ची जोड दिल्यामुळे स्वभावदोष अन् अहं यांचे निर्मूलन अधिक प्रमाणात होते’, हे दर्शवणारी पाहणी (सर्व्हे)** ५९

**१०. ‘स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाची प्रक्रिया’ राबवल्यामुळे साधकांना झालेला लाभ** ६४

**卐 परिशिष्ट** ६९

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ८४

# स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाची प्रक्रिया शिका आणि जीवन आनंदी बनवा !

‘स्वभावदोष आणि अहं हे ईश्वरप्राप्तीसाठीच्या साधनेतील दोन मोठे अडथळे आहेत. स्वभावदोष आणि अहं असला, तर वैयक्तिक जीवनही दुःखी होते आणि व्यक्तीमत्त्वाचा विकासही खुंटतो. स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाच्या प्रक्रियेसाठी भारतातील अनेक राज्यांतून सनातनच्या रामनाथी, गोवा येथील आश्रमात अनेक साधक येतात. आश्रमातील ‘स्वयंपाक-विभाग’ हा या प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे; कारण स्वयंपाक-विभागातील पू. रेखा काणकोणकर आणि सौ. सुप्रिया माथूर साधकांना प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करतात अन् स्वयंपाक-विभागात सेवा करण्याच्या माध्यमातून साधकांना प्रक्रियेसंबंधीचा प्रायोगिक भागही शिकता येतो. यामुळे शेकडो साधक काही मासांतच (महिन्यांतच) योग्य साधना करायला लागतात.

पू. रेखा काणकोणकर आणि सौ. सुप्रिया माथूर साधकांना प्रक्रियेविषयीच्या सत्संगात काय मार्गदर्शन करतात, साधकांकडून प्रक्रिया कशी राबवून घेतात, याचे अनेक साधकांना कुतूहल असते. वर्ष २०१६ मध्ये मार्च, एप्रिल आणि मे या तीन मासांत सनातनच्या ज्ञानप्राप्तकर्त्या साधिका कु. मधुरा भोसले यांना सौ. सुप्रिया माथूर यांनी घेतलेल्या अशा सत्संगांना उपस्थित रहाण्याची संधी मिळाली. सौ. सुप्रिया माथूर यांचे मार्गदर्शन कु. मधुरा भोसले यांनी प्रस्तुत ग्रंथाच्या स्वरूपात सुंदर प्रकारे संकलित केले आहे. त्यातून सर्वच साधकांना स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाच्या प्रक्रियेची दिशा मिळेल. बऱ्याच साधकांना प्रक्रिया शिकण्याची तीव्र इच्छा असूनही काही अडचणींमुळे रामनाथी आश्रमात येऊन प्रक्रिया शिकता येत नाही. अशांना हा ग्रंथ निश्‍चितच पुष्कळ उपयोगी ठरेल. केवळ अनेक वर्षांपासून साधना करणाऱ्यांसाठीच नव्हे, तर जिज्ञासू आणि नवीन साधक यांच्यासाठीही हा ग्रंथ म्हणजे, जीवनात आनंदप्राप्तीचा मार्ग दर्शवणारा दीपस्तंभच ठरेल.

सौ. सुप्रिया माथूर यांना वाईट शक्तींचा तीव्र त्रास आहे. असे असतांनाही त्यांच्यातील ‘सर्व साधकांना साधनेत पुढे घेऊन जाण्याची तळमळ आणि भाव’ या गुणांमुळे त्या साधकांना उत्तम मार्गदर्शन करून त्यांच्यात पालट घडवून आणत आहेत. हे खरोखरच कौतुकास्पद आहे.

सनातनच्या ‘स्वभावदोष आणि अहं यांचे निर्मूलन’ या मालिकेतील इतर ५ ग्रंथ आणि ‘अहं-निर्मूलन’ याविषयीचा १ ग्रंथ हेही उपलब्ध आहेत. त्यांमध्ये त्या त्या विषयाची मूलभूत तात्त्विक आणि प्रायोगिक माहिती दिली आहे. वाचकांनी आधी त्या ग्रंथांचा अभ्यास केल्यास त्यांना प्रस्तुत खंड अधिक चांगल्या प्रकारे समजेल; कारण प्रस्तुत खंडामध्ये प्रामुख्याने ‘स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाची प्रक्रिया राबवत असलेल्यांना ती अधिक परिणामकारकपणे आणि नेमकेपणाने कशी राबवावी’, याचे मार्गदर्शन केले आहे.

‘या खंडाच्या अभ्यासाने सर्वच साधकांना प्रक्रिया चांगल्या प्रकारे राबवता येऊन त्यांचे जीवन आनंदी बनो आणि त्यांना शीघ्र ईश्वरप्राप्ती करून घेता येवो’, ही श्री गुरुचरणी प्रार्थना !’

**– (परात्पर गुरु) डॉ. आठवले (९.९.२०१७)**

## सनातनच्या ‘स्वभावदोष आणि अहं यांचे निर्मूलन’ या मालिकेतील अन्य ग्रंथ !

- स्वभावदोष (षड्रिपू)-निर्मूलनाचे महत्त्व आणि गुण-संवर्धन प्रक्रिया
- स्वत:तील स्वभावदोष कसे शोधावेत ?
- स्वयंसूचनांद्वारे स्वभावदोष निर्मूलन
- स्वभावदोष-निर्मूलनासाठी बौद्धिक आणि कृतीच्या स्तरांवरील प्रयत्न
- स्वभावदोष-निर्मूलनासाठी आध्यात्मिक स्तरावरील प्रयत्न